N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गोंदिया   **P.S.(ठाणे):** तिरोडा   **Year (वर्ष):** 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0029   **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 21/01/2019 17:07 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 13(1)d |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): सोमवार   **Date From** (दिनांक पासून): 21/01/2019

**Time Period (कालावधी):** पहर 4   **Date To** ( दिनांक पर्यंत): 21/01/2019

**Time From** (वेळेपासून): 11:58 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 12:20 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 21/01/2019   **Time** (वेळ): 16:39 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद 030   **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 21/01/2019 16:39 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): Oral

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 0.1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): उपकोषागार कार्यालय समोर,तिरोडा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): रमाकांत कोकाटे पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव)

(c) **Date/Year of Birth** (जन्म 1976   (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):   **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

# फिर्याद

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,गोंदिया
कॅम्प— तिरोडा
दिनांक :— २१/०१/२०१९

मी रमाकांत दत्तात्रय कोकाटे, वय ४३ वर्षे, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया शासनातर्फे फिर्याद देतो की, दि. १८/०१/२०१९ रोजी कार्यालयात हजर असतांना तक्रारदार श्री. डोंगरू सिताराम ठाकरे, वय ६० वर्ष, व्यवसाय— शेती, रा. कवलेवाडा, ता. तिरोडा, जि. गोंदिया हे एका लोकसवेका विरुध्द लाच मागणी संबधाने तक्रार देण्याकरीता कार्यालयात आले. त्यांची तक्रार नोंदविली, ती पुढील प्रमाणे आहे.

'' मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे येवून तक्रार नोंदवितो की, वरील पत्यावर कुटूंबासह राहतो व शेतीचे काम करतो.

मौजा कवलेवाडा येथे भु.गट क्र. २१२ मध्ये ४.७२ हे. आर. वडीलापार्जीत शेतजमीन आहे. या शेतजमीनीपैकी १.४७ हे.आर. शेत जमीन माझ्या ताब्यात असुन उर्वरीत शेतजमीन माझ्या नातेवाईकाच्या ताब्यात आहे. माझ्या ताब्यातील शेतजमीनीमध्ये धानाचे पिक घेत असतो. सन २०१८ च्या खरीप हंगामा मध्ये मी धानाचे पिक लावले होते. माहे आक्टोंबर २०१८ मध्ये माझ्या शेतीमध्ये जंगली डुकरांनी धानाचे पिकाची नासधुस केली होती. त्यामुळे मी पिकाच्या नुकसान भरपाई साठी वनक्षेत्र अधिकारी कार्यालय तिरोडा येथे आवश्यक कागदपत्रासह अर्ज केला होता. माझ्या अर्जावरून श्री के.डी. पटले, वनरक्षक, बिट क्षेत्र कवलेवाडा यांनी माझ्या शेतीवर येवुन शेतीची पाहणी करून नुकसान भरपाईचा पंचनामा केला. त्यानंतर त्यांनी माझ्या शेत पिकाची नुकसान भरपाई मिळवुन देण्याकरीता माझ्याकडे २,०००/—रू. ची मागणी केली होती. त्यावेळी मी त्यांना नुकसान भरपाईचे देयक माझ्या खात्यात जमा झाल्या नंतर पैसे देईन असे नाईलाजाने म्हटले होते.

दि. ०६/०१/२०१९ रोजी श्री. के.डी. पटले, वनरक्षक, बिटक्षेत्र कवलेवाडा यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक ७२६३९७०५८४ वरून माझे मोबाईल क्रमांक ९६३७९१२३०७ वर फोन करून म्हटले की, तुमच्या शेत पिकाची नुकसान भरपाई ची रक्कम ७३५०/— रू. तुमच्या बॅक खात्यात जमा केली आहे. तुम्ही मला २०००/— रू. लवकरात लवकर आणुन दया. त्यावर मी त्यांना ठिक आहे असे बोलुन फोन बंद केला. त्यानंतर त्यांनी पुन्हा दि. ०९/०१/२०१९ रोजी मला फोन करून २०००/— रू. आणुन देण्यास सांगितले होते.

गै.अ. श्री. के.डी. पटले, वनरक्षक, बिटक्षेत्र कवलेवाडा, वनक्षेत्राधिकारी कार्यालय, तिरोडा जि. गोंदिया यांनी माझ्या शेत पिकाची नुकसान भरपाईचे देयक काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन माझ्याकडे रू. २०००/— लाचेची मागणी केली आहे. माझ्याकडे मागणी केलेली रू. २,०००/— लाच रक्कम त्यांना देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने गै.अ. श्री. के.डी. पटले, वनरक्षक यांचे विरुध्द कार्यवाही करण्याकरीता मी स्वेच्छेने तक्रार देत आहे. त्यांचेशी माझे पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. तरी त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.''

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,गोंदिया,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,गोंदिया,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9823629272

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | किशोर धोंडु पटले | | | 1. नेहरु वार्ड , साई कालोणी ,तिरोडा, तिरोडा,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | अत्तर बनविण्यास उपयुक्त गवत | भारतीय चलनाच्या 500रुपयाचे 04 चलनी नोटा | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

प्रकरण असे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी किशोर धोंडु पटले यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व गैर मार्गाने तक्रारदार श्री .डोंगरु सिताराम ठाकरे यांना त्याचे शेतीत जंगली जनावराने केलेल्या शेत पिकाची नुकसान भरपाईची रक्कम रू.7350/- काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन तक्रारदाराकडे रु.2000/-लाच रक्कमेची मागणी करुन रु.2000/-लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. फिर्यादीचे लेखी फिर्याद वरुन सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** BANSIALAL zhingarji **Rank (पद):** Asst. SI (Assistant Sub-
**No.(क्र.):** POBN28948 **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

तक्रारदाराच्या तक्रारीनुसार पुढील सापळा कार्यवाही करीता दि. १८/०१/२०१८ रोजी मा. सहायक कामगार आयुक्त, गोंदिया यांचेशी पत्रव्यवहार करुन श्री. आशिष उमराव सरोदे, लिपीक टंकलेखक व श्री. चंद्रकांत गंगाधर मरस्कोल्हे, लिपीक टंकलेखक, दोन्ही कार्यालय सहायक कामगार आयुक्त, गोंदिया यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. तक्रारदार श्री. ठाकरे यांची वरील प्रमाणे तक्रार नोंदवुन घेतल्यानंतर सदर तक्रारीवरुन लाच मागणीची पडताळणी करुन पुढील सापळा कार्यवाही करण्यासाठी दोन्ही पंचांची पंच म्हणुन काम करण्याची संमती घेवुन पुढील सापळा कार्यवाही दि. १९/०१/२०१९ रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दि. १८/०१/२०१९ रोजी केलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. १ मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

त्यानंतर दि. १९/०१/२०१९ चे १३:३५ ते १४:०८ वा. दरम्यान गै.अ. श्री किशोर धोंडु पटले, वनरक्षक, तिरोडा यांची तक्रारदाराकडे असलेल्या लाच मागणीची पडताळणी तहसिल कार्यालय, तिरोडा जवळ पंच क्र. १ यांचे समक्ष कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकार्डरद्वारे करण्यात आली. तक्रारदार व गै.अ. यांचेतील लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकार्डरच्या मेमोरी कार्ड मध्ये रेकार्ड करण्यात आले.

या लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान डिजिटल व्हॉईस रेकार्डर मधील ध्वनिमुद्रित संभाषण व त्या संभाषणास पंच क्र. १ यांनी दिलेल्या दुजोऱ्यावरुन, गै.अ. श्री किशोर धोंडु पटले, वनरक्षक यांनी तक्रारदाराच्या शेतीत जंगली जनावरांनी केलेल्या शेत पिकाची नुकसान भरपाईची रक्कम रु. ७,३५०/— काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन तक्रारदाराकडे रु. २,०००/— लाच रक्कमेची मागणी करून ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यावरुन गै.अ. श्री. किशोर धोंडु पटले, .वनरक्षक, तिरोडा यांचेविरूध्दची पुढील सापळा दि. २१/०१/२०१९ रोजी रचण्याचे ठरविण्यात आले. दि. १९/०१/२०१९ रोजी केलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. २ मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

त्यानंतर आज दि. २१/०१/२०१९ रोजी वेळ ११:५८ ते १२:२० वा. गै.अ श्री किशोर धोंडु पटले, वनरक्षक, तिरोडा यांचेविरुध्द उपकोषागार कार्यालय, तिरोडा समोर लाचेचा यशस्वी सापळा कार्यवाही दरम्यान वेळ १२:१८ वा आरोपी श्री. किशोर धोंडु पटले, वनरक्षक यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैर मार्गाने तक्रारदार श्री. डोंगरू सिताराम ठाकरे यांना त्यांच्या शेतीत जंगली जनावरांनी केलेल्या शेत पिकाची नुकसान भरपाईची रक्कम रु. ७,३५०/— काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन त्यांच्याकडे रु. २,०००/— लाच रक्कमेची मागणी करुन रु. २,०००/— लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली.

या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी श्री किशोर धोंडु पटले यांचेकडुन वेगळया जप्तीपत्रका प्रमाणे खालील प्रमाणे मुद्देमाल तपास कामी जप्त करण्यात आला.

**जप्तीपत्रक क. १ नुसार**

१) आरोपी श्री किशोर धोंडु पटले यांनी तक्रारदार यांचेकडुन स्विकारलेली लाच रक्कम रू. २,०००/— ज्यात रू. ५००/— दराच्या ४ चलनी नोटा आहेत, त्यांचे क्रमांक खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| 7HH 227564 | 5EL 925552 | 5HW 484476 | 5NT 689063 |

[signature] 21/1/19

पोलीस स्टेशन तिरोडा

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** . (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): ~~KAILASH VISHNU GAVATE~~ ROSHAN GONDANE

**Rank**(पद): ~~SI (Sub-Inspector)~~ NPC-1131

**No.**(सं.): POBN820333

ड्युटी ऑफीसर
पोलीस स्टेशन तिरोडा

जप्तीपत्रक क्र. २ नुसार

१) आरोपी श्री किशोर धोंडु पटले यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम रु. २,०००/– आपले उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन उजव्या हाताने अंगात घातलेल्या काळ्या रंगाच्या फुलपॅन्टच्या मागील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवल्याने सदर काळ्या रंगाच्या फुलपॅन्ट आरोपीकडुन जप्तीपत्रका प्रमाणे तपास कामी जप्त करण्यात आला.

या सापळा कार्यवाही वेळी आरोपी श्री किशोर धोंडु पटले यांचे डावे व उजवे हाताची बोटे तसेच फुलप्यांट अल्ट्राव्हॉयलेट टॉर्चच्या प्रकाशात तपासले असता, त्यांच्या दोन्ही हाताचे बोटावर तसेच त्यांनी अंगात घातलेल्या काळ्या रंगाच्या फुलपॅन्टच्या मागील उजव्या बाजुच्या खिश्याचे तोंडावर व खिश्याचे आतील कापडावर अॅन्थ्रासीन पावडरची निळ्या सोनेरी रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच तक्रारदार यांचे दोन्ही हाताची बोटे अल्ट्राव्हॉयलेट दिवाच्या प्रकाशात तपासले असता त्यांचे उजवे हाताचे बोटावर निळ्या सोनेरी रंगाची चकाकी दिसुन आली. आज दिनांक २१/०१/२०१९ रोजी केलेल्या सापळा कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. ३ मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

आज दि. २१/०१/२०१९ रोजी वेळ ११:५८ ते १२:२० वा दरम्यान आरोपी श्री किशोर धोंडु पटले, वनरक्षक यांचेविरुध्द उपकोषागार कार्यालय, तिरोडा समोर लाचेचा सापळा रचण्यात आला. या लाचेच्या यशस्वी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी श्री. किशोर धोंडु पटले, वय ५० वर्ष, वनरक्षक, बिटक्षेत्र तिरोडा, वनपिरक्षेत्र कार्यालय, तिरोडा, जि. गोंदिया, (वर्ग–३), रा. नेहरु वार्ड, साई कॉलोनी, तिरोडा, जि. गोंदिया यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैर मार्गाने तक्रारदार श्री. डोंगरू सिताराम ठाकरे, वय ६० वर्ष, व्यवसाय– शेती, रा. कवलेवाडा, ता. तिरोडा, जि. गोंदिया यांना त्यांच्या शेतीत जंगली जनावरांनी केलेल्या शेत पिकाची नुकसान भरपाईची रक्कम रु.. ७,३५०/– काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन त्यांच्याकडे रु. २,०००/– लाच रक्कमेची मागणी करुन रु. २,०००/– लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. त्यांचे हे कृत्य कलम ७(b) लाचलुचपत प्रतिबंध (संशोधन) अधिनियम २०१८ अन्वये गुन्हा होत असल्याने माझी शासनातर्फे त्यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

21.1.19

(रमाकांत कोकाटे)
पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,गोंदिया.

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

## General Diary Details
## ठाणे दैनंदिनी तपशील

**Date** 21/01/2019 17:11

**State (राज्य):** महाराष्ट्र

**P.S.** (पोलीस तिरोडा

**District** गोंदिया

1. **G.D. No.** (ठाणे दैनंदिनी 033
2. **G.D. Date** (ठाणे दैनंदिनी 21/01/2019 17:11 बजे
3. **G.D. Type** (ठाणे दैनंदिनी इतर नोंद
4. **Entry for (officer)** (प्रविष्टि(अधिकार्यासाठी BANSIALALzhingarjiSHENDE
5. **Case Type** (प्रकरणाचा
6. **G.D. Brief** (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):
   यावेळी नोंद आहे की, पोस्टे तिरोडा येथे अपराध क्र. 29/2019 कलम- 7,13(1)(ड), लाचलुचपत प्रतिबंधक कायदा -1988 हा मुळ कायद्यातील कलमान्वये दाखल करण्यात आला असुन सदर मुळ कायद्यात संशोधन झाले असुन लाचलुचपत प्रतिबंधक संशोधन अधिनियम 2018 हा कायदा सध्या CCTNS प्रणालीवर अपलोड झाला नसल्याने सदरचा गुन्हा मुळ कायद्यातील कलमान्वये दाखल करण्यात आला आहे. कलम -7,13(1)(ड) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा -1988 यास कलम 7(b) लाचलुचपत प्रतिबंधक संशोधन अधिनियम 2018 असे समजण्यात यावे. करीता नोंद.
7. **Subject** (विषय):
   संशोधन कायदा CCTNS प्रणालीवर अपलोड झाला नसल्याने
8. **Acts & Sections** (अधिनियम आणि कलम):

| S.No.(अ. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

ADCI 7/1

**Report Printed on** (अहवाल मुद्रित केलेली 21/01/2019

**Report Printed by** (द्वारे अहवाल मुद्रित केला):

**Name** KAILASH VISHNU GAVATE

**Rank** (पद): SI (Sub-Inspector)

**Signature**

**Name** ~~KAILASH VISHNU GAVATE~~ ROSHAN GONDANE

**Rank** (पद): ~~SI (Sub-Inspector)~~ NPC-1131

**No.**(क्र.): POBN820333